# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २२/१२/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दिनांक २२/१२/२०११ रोजी सभा सुचना क्र. १९ दि. १६/१२/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात दुपारी १२.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्रीम. कल्पना महेश म्हात्रे ह्या उपस्थित होत्या. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | सभापती |
| २. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| ३. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ४. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ५. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ६. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |
| ७. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ८. | श्री. शफिक अहमद सादत खान | सदस्य |
| ९. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १०. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| ११. | श्रीम. नयना म्हात्रे | सदस्या |
| १२. | श्रीम. मर्लिन डिसा | सदस्या |
| १३. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | सदस्य |
| १४. | श्रीम. नर्मदा वैती | सदस्या |
| १५. | श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य - निरंक</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मधुसुदन पुरोहित | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व स्थायी समिती सदस्य, अधिकारी व कर्मचारी वर्ग यांना माझ्या तर्फे ख्रिसमस आणि नविन वर्षाच्या शुभेच्छा. आजच्या स्थायी समिती सभेमध्ये सी.आर.झेड. नकाशे तयार करणे, पाणी पुरवठा पंपींग सेशन बाबतचे विषय, सार्वजनिक बांधकाम विभागातील अवलोकन या विषयावर सविस्तर चर्चा करुन खेळीमेळीमध्ये ही सभा पार पाडावी अशी मी विनंती करते. सचिव साहेब सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. २२/१२/२०११ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १९, दि. १६/१२/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ९७, दि. १९/११/२०११ व ०१/१२/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**भगवती शर्मा :-**

दि. १९/११/२०११ व ०१/१२/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९७ :-**

दि. १९/११/२०११ व ०१/१२/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क. ८६ :-**

दि. १९/११/२०११ व ०१/१२/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९८, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी सि.आर.झेड. नकाशे तयार करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती मॅडम, तुम्ही ठराव करा. त्याच्यात काही प्रॉब्लेम नाही. पण अगोदर या विषयावर चर्चा करणे गरजेचे आहे. कारण, संबंधित विभाग आहे नगररचना. मॅडम या गोषवाऱ्याप्रमाणे सी.आर.झेड. ची जी रेषा आहे ती ठरवण्यासाठी अधिसुचना काढली ती दि. ६/१/२०११ ला काढले. आणि प्रशासनाने ११ महिने लेट म्हणजे आज आपल्यासमोर विषय आणलेला आहे. आणि त्याची मुदत २४ महिन्यासाठी आहे. २४ महिन्याच्या आतमध्ये त्यांनी जे नकाशे तयार करणे आणि आपण त्यांना आता मंजुरी देतो. मग, प्रशासनाकडून अशी दिरंगाई का झाली? कारण त्यांना गरज नव्हती का? या क्षेत्रामध्ये, सी.आर.झेड मध्ये बरेच त्यांनी दिलेल आहे. १९७० पासून इमारती आहेत. त्या पण सी.आर.झेड. च्या बाधित आहे. मुर्धा गाव आहे, राई गाव आहे, मोरवा गाव आहे, घोडबंदर आहे, मिरारोड आहे. असे बरेच विभाग आहेत की, त्यांना सी.आर.झेड. बाधित आहे. त्याची अधिसुचना दि.६/१/२०११ ला निघाली त्यावेळी जर केल असत तर आज लवकर नकाशे तयार झाले असते. पुन्हा आपल्याला त्यांच्यासाठी मुदतवाढ घ्यावी लागेल. जर आपल ते वेळोवेळी झाल नाही तर मुदतवाढ घ्यावी लागेल. संबंधित विभागाने निवेदन कराव की, एवढी दिरंगाई का झाली?

**सत्यवान धनेगावे :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगी बोलतो. ६/१/२०११ ला नविन सी.आर.झेडच नोटिफिकेशन केंद्र शासनाने जारी केलेल आहे. केंद्र शासनाने नोटीफिकेशन जारी केल्यानंतर हे सर्व ऑल ओवर इंडियासाठी हे नोटिफिकेशन आहे. या नोटिफिकेशननुसार सी.आर.झेड. चे नकाशे बनवण्याबाबत गर्व्हमेंटने आपल्याला मार्च २०११ मध्ये कळवल होत. त्यानुसारच करसपोन्डन्स तिरुअनंतपुरम संस्थेशी आम्ही केलेल आहे. त्यांनी कन्सल्ट दिल की, २७/९/२०११ रोजी आपल्याला खर्च कळवला किती खर्च लागतो तो त्यानंतर आपण सभेपुढे ठेवलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

आज सर्व्हेक्षण केल त्यानंतर केंद्र शासनाकडे सी.आर.झेड. मंजुरीसाठी पाठवणार आहे. याच्याने आपल्याला जी सी.आर.झेड ची रेषा आहे. ती कमी करण्यासाठी आपण त्यांच्याजवळ डिमान्ड करु.

**सत्यवान धनेगावे :-**

कमी म्हणजे यामध्ये जे करेक्शन आहेत की, पूर्वी इमारती बऱ्याच जून्या आहेत. त्यावरती पण सी.आर.झेड. आला आहे. त्यासाठी आपल्याला रि-डेव्हपमेन्ट मध्ये प्रॉब्लेम येतात. ते प्रॉब्लेम यायला नको या हिशोबाने सगळा प्लान बनवला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

ग्रामपंचायत साली या इमारती झालेल्या आहेत त्या सी.आर.झेड मध्ये झालेल्या असतील. त्यांच काय होईल?

**सत्यवान धनेगावे :-**

त्या बाबतचा सर्व्हेक्षण होईल ना. नविन प्लान होता ना.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपण करणार. अभिप्राय तर देणार नंतर काय?

**सत्यवान धनेगावे :-**

ते सर्व्हेक्षण नंतर डिसाईड होणार.

**जुबेर इनामदार :-**

अधिकार कोणाचे?

**सत्यवान धनेगावे :-**

ऑथोरिटीचे आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर शहरात ग्रामपंचायत काळापासून सुमारे १९७० सालापासून इमारती बांधलेल्या आहेत. सि.आर.झेड. कायदा १९९१ साली अस्तित्वात आला, पण त्याची अंमलबजावणी सन २००० नंतर झाली.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचा ‘‘कोस्टल झोन मॅनेजमेंट नकाशा’’ (CZMP) शासनाकडून पत्र क्र. टिपीएस - २००४/मिरा-भाईंदर/युडी-१२, दि.३०/०६/२००५ अन्वये प्राप्त झालेला आहे. या नकाशानुसार भाईंदर (प.), भाईंदर (पु.), मिरा रोड (पु.), घोडबंदर, इ. विकसीत क्षेत्र ही CRZ-III ने बाधीत होत आहे. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेने शासनाकडे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/ ३३९१/२०१०-११, दि.१८/१२/२०१० अन्वये सि.आर.झेड. नकाशाचे वर्गीकरणात बदल करण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. तद्नंतर केंद्र शासनाचे सि.आर.झेड. बाबत अधिसूचना दि.०६/०१/२०११ रोजी प्रसिध्द झालेली आहे. या अधिसूचनेनुसार सि.आर.झेड. नकाशे तयार करणेबाबत निर्देश आहेत. याबाबत एम.सी.झेड.एम. ने दि.०८/०३/२०११ चे पत्रान्वये सि.आर.झेड. नकाशे तयार करणेबाबत महानगरपालिकेस कळविले आहे.

सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहराकरिता Cadastral Map बनविण्याकरिता मा. संचालक, ‘‘सेंटर फॉर अर्थ सायन्स स्टडिज’’ (CESS) या संस्थेस नियुक्त करणेबाबत पत्र क्र. मनपा/नर/१२०४/२०११-१२, दि.११/०७/२०११ अन्वये कळविलेले आहे व पत्र क्र. मनपा/नर/१८७९/२०११-१२, दि.१६/०९/२०११ अन्वये उपरोक्त प्रकरणात स्मरणपत्र दिलेले आहे.

सदर प्रकरणात सेंटर फॉर अर्थ सायन्स स्टडिज (CESS) यांनी दि.२७/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये शहराकरिता Cadestral Map बनविणेकरिता लागणारा खर्च रु.५०,०००/- प्रती कि.मी. तसेच सर्वेक्षण व सि.आर.झेड. नकाशे (HTL सह) तयार करणेसाठीचा दर मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सादर केलेले आहेत.

केंद्र शासनाचे दि.०६/०१/२०११ चे अधिसूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी सि.आर.झेड. नकाशांचे फेरवर्गीकरणाची कार्यवाही २४ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे.

सध्याचे अस्तित्वात असलेल्या सि.आर.झेड. नकाशानुसार (HTL) रेषेची लांबी काढली असता, ती ७० कि.मी. येत आहे. यानुसार या कामासाठी सुमारे ३५ लाख खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरिता सभा मंजूरी देत आहे. तसेच या प्रकरणातील पुढील कार्यवाही आयुक्त यांनी करण्याकरिता सभा मंजूरी देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, ही जी सेंटर फॉर अर्थ सायन्स स्टडीज ही जी संस्था आहे. ती गर्व्हमेंटची आहे की, गर्व्हमेंट रेकग्नाईज आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

केरळ गर्व्हमेंटची आहे.

**अनिल सावंत :-**

मग, पूर्ण देशामध्ये ही एकच संस्था आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

दुसरी पण आहे. स्टेट गर्व्हमेंटने या संस्थेला काम दिलेल आहे.

**अनिल सावंत :-**

स्टेट गर्व्हमेंटनी दिल ठिक आहे. पण ऑल ओवर इंडियामध्ये अशा किती संस्था आहेत. त्यांच्या जवळून आपण कोटेशन वैगेरे काही बेतच आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

कोटेशन हे गर्व्हमेंटने डिसाईड केलेल आहे.

**अनिल सावंत :-**

ही संस्था तुम्ही घ्या. म्हणून असा गर्व्हमेंटचा जी.आर. आहे. कम्पलसरी आहे. मा. सभापती मॅडम, नगररचना विभागाचा विषय आहे. या नगररचना विभागाचा अजूनपर्यंतचा इंटरनल ऑडिट झालेल नाही. ही गोष्ट खरी आहे का?

**मा. सभापती :-**

नाही झालेला आहे.

**अनिल सावंत :-**

मग, ते ऑडिट अजूनपर्यंत का केलेल नाही. इतर विभागाच करतो ना. मग, या विभागाच का केल नाही. गर्व्हमेंटचा जी.आर. वैगेरे आहे का की, या विभागाच ऑडिट करायच नाही.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

सन्मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो, नगररचना विभाग जो आहे त्याच्यामध्ये स्पेशली पूर्णपणे रिसिटचा भाग येतो. आणि जवळपास आपण रिसिट्स ऑडिट करत नाही. एक सॅम्पल ऑडिट करतो. का तर आपल्याकडे स्टाफ उपलब्ध नाही.

**अनिल सावंत :-**

रिसिटचे कसे त्याच्यामध्ये तुम्ही टी.डी.आर. देता. टी.डी.आर. दिल्यानंतर सी.सी. देता. सी.सी. दिल्यानंतर काहींना ओ.सी. देता त्याच्यामध्ये सर्व आहे ना. प्लान सॅक्शन करता. प्लॉन सॅक्शन करतेवेळी ती जागा कोणाची आहे काय काय? आर्किटेक्चर कोण आहे? या सर्व गोष्टी ऑडिट मध्ये येतात ना.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

बरोबर आहे. कारण फक्त रिसिटच ते ऑडिट आहे तर ते रिसिटच ऑडिट जनरली करत नाही. आपल्याकडे तेवढा स्टाफ नाही.

**अनिल सावंत :-**

स्टाफ नाही. म्हणून ऑडिट करायच नाही.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

महत्वाच्या विषयच कवर करतो ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय आज निघालेला आहे. पण किती वर्षापासून होत नाही.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

महापालिका स्थापन झाल्यापासून होत नाही. पण केंद्र सरकारच्या एजन्टने केलेल आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा जो विषय निघालेला आहे तो चांगला निघालेला आहे. १० वर्षापासून ऑडिट होत नाही. यापूर्वी सन्मा. सभापती डायस्टवर होते. मॅडम, हा विषय आजचा विषय नाही. तुम्ही पुढच्या वेळी घ्या. आणि आयुक्त साहेबांना बोलवून ऑडिटवर एक विषय घेवू की, कुठल्या-कुठल्या विभागाचे ऑडिट होणे आवश्यक आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती मॅडम, आपण जी ३५ लाखाला मंजूरी दिली. आता आपल्या स्थायी समितीचा अधिकार आहे का. ३५ लाख रु. ला आर्थिक प्रशासकीय मंजुरी द्यायला याचा खुलासा प्रशासनाने केला तर बर होईल.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.)):-**

मा. स्थायी समितीला आर्थिक व प्रशासकीय मंजूरी द्यायची ५० लाखापर्यंतचे अधिकार दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

सचिव साहेब पूढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ९८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी सि.आर.झेड. नकाशे तयार करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ८७ :-**

मिरा भाईंदर शहरात ग्रामपंचायत काळापासून सुमारे १९७० सालापासून इमारती बांधलेल्या आहेत. सि.आर.झेड. कायदा १९९१ साली अस्तित्वात आला, पण त्याची अंमलबजावणी सन २००० नंतर झाली.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचा “कोस्टल झोन मॅनेजमेंट नकाशा” (CZMP) शासनाकडून पत्र क्र. टिपीएस - २००४/मिरा-भाईंदर/युडी-१२, दि.३०/०६/२००५ अन्वये प्राप्त झालेला आहे. या नकाशानुसार भाईंदर (प.), भाईंदर (पु.), मिरा रोड (पु.), घोडबंदर, इ. विकसीत क्षेत्र ही CRZ-III ने बाधीत होत आहे. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेने शासनाकडे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/ ३३९१/२०१०-११, दि.१८/१२/२०१० अन्वये सि.आर.झेड. नकाशाचे वर्गीकरणात बदल करण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. तद्नंतर केंद्र शासनाचे सि.आर.झेड. बाबत अधिसूचना दि.०६/०१/२०११ रोजी प्रसिध्द झालेली आहे. या अधिसूचनेनुसार सि.आर.झेड. नकाशे तयार करणेबाबत निर्देश आहेत. याबाबत एम.सी.झेड.एम. ने दि.०८/०३/२०११ चे पत्रान्वये सि.आर.झेड. नकाशे तयार करणेबाबत महानगरपालिकेस कळविले आहे.

सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहराकरिता Cadastral Map बनविण्याकरिता मा. संचालक, “सेंटर फॉर अर्थ सायन्स स्टडिज” (CESS) या संस्थेस नियुक्त करणेबाबत पत्र क्र. मनपा/नर/१२०४/२०११-१२, दि.११/०७/२०११ अन्वये कळविलेले आहे व पत्र क्र. मनपा/नर/१८७९/२०११-१२, दि.१६/०९/२०११ अन्वये उपरोक्त प्रकरणात स्मरणपत्र दिलेले आहे.

सदर प्रकरणात सेंटर फॉर अर्थ सायन्स स्टडिज (CESS) यांनी दि.२७/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये शहराकरिता Cadestral Map बनविणेकरिता लागणारा खर्च रु.५०,०००/- प्रती कि.मी. तसेच सर्वेक्षण व सि.आर.झेड. नकाशे (HTL सह) तयार करणेसाठीचा दर मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सादर केलेले आहेत.

केंद्र शासनाचे दि.०६/०१/२०११ चे अधिसूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी सि.आर.झेड. नकाशांचे फेरवर्गीकरणाची कार्यवाही २४ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे.
सध्याचे अस्तित्वात असलेल्या सि.आर.झेड. नकाशानुसार (HTL) रेषेची लांबी काढली असता, ती ७० कि.मी. येत आहे. यानुसार या कामासाठी सुमारे ३५ लाख खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरिता सभा मंजूरी देत आहे. तसेच या प्रकरणातील पुढील कार्यवाही आयुक्त यांनी करण्याकरिता सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९९, निवीदा मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**शशिकांत भोईर :-**

याच्यामध्ये कुठेही किती मिटर, किती किलो मिटर, पाईप लाईन खरेदी करायचा त्याचा उल्लेख नाही. अमाऊंटचा पण उल्लेख बरोबर नाही. तुम्ही खर्च किती करणार आहेत? माझ्या माहितीप्रमाणे २००८ ला हा एक ठराव झाला होता की, आर्थिक, प्रशासकीयची मंजुरी घेतात त्यानंतर २०११ ला आलेला आहे. २००८ ला जो ठराव झाला त्याच्यामध्ये किती करोडची पाईप लाईन मागवली याचा कुठे उल्लेख नाही. आणि आपण त्याचा सरळ-सरळ मंजुरी द्यायची का? पाणी पुरवठा विभागाने त्याचा खुलासा करावा की, आपण याच्या अगोदर असा ठराव कधी केला होता की, एवढे पाईप लाईन विकत घ्यायचे आहे. आणि कुठे-कुठे टाकले? आज आपण मंजुरी मागितलेली आहे. किती किलो मीटर आहे त्याचा अंदाज नाही. किती मिटर घ्यायचे त्याचा पण अंदाज नाही. म्हणजे आपण पाईप लाईन मागवायचे तर ते किती? किती वर्षासाठी? याचा उल्लेख नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती मॅडम, हा जो विषय आलेला आहे. यापूर्वी ३ विषय असे आले होते पाईप मंजुरीचे. छोटे-छोटे विषय होते. त्यावेळी अधिकारी हेच म्हणायचे की, जेवढी आवश्यकता असेल तेवढी पाईप खरेदी करु. फक्त दराची आपण मंजुरी घेतो. आणि दराची मंजुरी घेतल्यानंतर वेळोवेळी त्यांना जी खरेदी करायच ते खरेदी करतील. मग, जी खरेदी करायच ते खरेदी करतील. मग, आज हा विषय कशाला काढला की, किलो मिटर नाही दिले. दर दिलेले नाही. आपण दर निश्चित करतो. मी पाच वर्षापासून बघतो मी स्वतः स्टँडिंगमध्ये २००८ साली सदस्य होतो. त्यावेळी सुध्दा हा प्रश्न विचारला होता. त्यावेळी सांगितल की, फक्त दर निश्चित करतो. दराप्रमाणे जेवढी आवश्यकता असेल तेवढ घेवू. म्हणून आता हा विषय त्याच्यामध्ये नाही.

**जुबेर इनामदार :-**

हरकत नाही. ठिक आहे. पण कधी पर्यंत? परत दर वाढेपर्यंत?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दि. ०४/१०/२०११ रोजीच्या दै. फ्रि प्रेस जनरल व दै. पुढारी या वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या विषयांकीत निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदा दिनांक १९/१०/२०११ रोजी उघडण्यात आल्या. त्याबद्दलचा तपशिल खालीलप्रमाणे.

सी. आय. (एस. ॲन्ड एस.) टायटन पाईप्स (LA- Class) आय. एस. नं १५३६:२००१ आणि समकक्ष ISO/B.S स्टॅडंर्डप्रमाणे १०० मीमी ते ५०० मीमी व्यासाचे पुरवठा करणे.

| व्यास | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. निविदेचा दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी निविदेचा दर (रू.) | मे. नोबेल एंटरप्राईजेस निविदेचा दर (रू.) |
|---|---|---|---|
| १०० मि.मी | १२११.७० | ११७६.०० | १२१८.०० |
| १५० मि.मी | १९४२.५० | १८८५.०० | १९८२.०० |
| २०० मि.मी | २८४०.२५ | २७६०.०० | २८९७.०० |
| २५० मि.मि | ३८२७.२५ | ३९५०.०० | ३९०५.०० |
| ३०० मि.मि | ४९३५.०० | ५०९५.०० | ५०३४.०० |
| ३५० मि.मि | ६२११.२५ | ७८४४.०० | ६३४२.०० |
| ४०० मि.मि | ७५७०.५० | ९५४७.०० | ७७१८.०० |
| ४५० मि.मि | ९१३५.०० | ११५०८.०० | ९३०६.०० |
| ५०० मि.मि | १०७१०.०० | १३४७४.०० | १०८९८.०० |

वरील कामासाठी स्पर्धात्मक निविदा दर मागविण्यात आले होते. प्राप्त निविदेनुसार केशरी ॲन्ड कंपनीचे १००,१५०,२०० मि.मी. व्यासाकरीता व अे.ई. इन्फ्राप्रोजेक्टचे २५० ते ५०० मि.मी. व्यासाकरीता दर लघुत्तम आहेत. सदर बाबत केशरी ॲन्ड कंपनीचे १००,१५०,२०० मि.मी. व्यासाकरीता दर कमी करण्यास नकार दिलेला आहे. व अे.ई. इन्फ्राप्रोजेक्टचे २५० ते ५०० मि.मी. व्यासाकरीता दर वाटाघाटीकरीता ४ टक्के कमी करण्यास पत्र देऊन कळविले आहे. त्याप्रमाणे खालीलप्रमाणे दरसुची होत आहे.

| व्यास | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट लि. निविदेचा दर (रू.) | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट लि. वाटाघाटीअंती दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी निविदेचा दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी वाटाघाटीअंती दर (रू.) |
|---|---|---|---|---|
| **१०० मि.मी** | -- | -- | ११७६.०० | **११७६.००** |
| **१५० मि.मी** | -- | -- | १८८५.०० | **१८८५.००** |
| **२०० मि.मी** | -- | -- | २७६०.०० | **२७६०.००** |
| **२५० मि.मि** | ३८२७.२५ | **३६७४.१६** | -- | -- |
| **३०० मि.मि** | ४९३५.०० | **४७३७.६०** | -- | -- |
| **३५० मि.मि** | ६२११.२५ | **५९६२.८०** | -- | -- |
| **४०० मि.मि** | ७५७०.५० | **७२६७.६८** | -- | -- |
| **४५० मि.मि** | ९१३५.०० | **८७६९.६०** | -- | -- |
| **५०० मि.मि** | १०७१०.०० | **१०२८१.६०** | -- | -- |

सदर निविदेचा वाटाघाटीनंतरचे दर वरील प्रमाणे आलेले आहेत. तरी सदर दर हे वाजवी व रास्त असल्याने मान्यता देणेस शिफारस आहे. सबब उपरोक्त लघुत्तम दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजुरीस व याकामी वेळोवेळी येणारी देयके मंजूर करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**भगवती शर्मा :-**

मेरा अनुमोदन है।

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय, आमचा ठरावाला विरोध नाही. पालिकेला पाईप पाहिजे. गरजेप्रमाणे लागले पाहिजे. आणलेला विषय कितीपर्यंत योग्य आहे?

**एस.ए.खान :-**

पाईप लाईन टाकण्याच काम हे ठेका पध्दतीने देतो ना. ठेकेदार पाईप आणतो.

**मा. सभापती :-**

आता आपण चर्चा केली ना.

**जुबेर इनामदार :-**

उत्तरच देवू दिल नाही ना. अधिकारीला उत्तर देवू देत नाही.

**मा. सभापती :-**

तुम्हाला ठराव मांडायचा असेल तर ठराव मांडा.

**शशिकांत भोईर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने १०० मि.मि. १५०, २००, २५०, ३००, ४००, ४५०, ५०० मि.मि. जलवाहिनी मागविण्याच्या निविदेच्या गोषवाऱ्यात दोष आहे. कुठेही किती किलोमीटर जलवाहिनी मागविणे व किती वर्षासाठी निविदांना मागविल्या आहेत याचा उल्लेख नसल्यामुळे सदरच्या निविदा फेटाळण्यात याव्या असा ठराव मांडीत आहे.

**एस.ए.खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सचिव साहेब २ ठराव आलेले आहे. तर ठराव मतदानाचा टाका.

**अनिल सावंत :-**

प्रशासनाने याच्यामध्ये का दिल नाही? एका वर्षामध्ये आम्ही एवढी मिटर लाईन टाकणार आहोत किंवा बजेट प्रोव्हिजन एवढ आहे त्याच्यामध्ये एवढा खर्च होणार आहे. एवढ गोषवाऱ्यामध्ये टाकाना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती मॅडम, हा प्रश्न वेळोवेळी मी पण विचारलेला आहे. जेव्हा लागेल तेव्हा आपण दर कधी मागवतो..................

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९९ करीता २ ठराव आलेले आहे. पहिला ठरावाचे सुचक ओमप्रकाश अग्रवाल. आणि अनुमोदक भगवती शर्मा. दुस-या ठरावाचे सुचक शशिकांत भोईर आणि अनुमोदक एस.ए.खान. दुस-या ठरावाचे वाचन करुन मतदानास घेतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेने १०० मि.मि. १५०, २००, २५०, ३००, ४००, ४५०, ५०० मि.मि. जलवाहिनी मागविण्याच्या निविदाचा गोषवारा सदोष आहे. कुठेही किती किलोमीटर जलवाहिनी मागविणे व किती वर्षासाठी निविदांना मागविल्या आहेत याचा उल्लेख नसल्यामुळे सदरच्या निविदा फेटाळण्यात याव्या असा ठराव मांडीत आहे. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हातवर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. पहिला ठराव वाचतो. दि. ०४/१०/२०११ रोजीच्या दै. फ्रि प्रेस जनरल व दै. पुढारी या वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या विषयांकीत निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदा दिनांक १९/१०/२०११ रोजी उघडण्यात आल्या. त्याबद्दलचा तपशिल खालीलप्रमाणे.

सी. आय. (एस. ॲन्ड एस.) टायटन पाईप्स (LA- Class) आय. एस. नं १५३६:२००१ आणि समकक्ष ISO/B.S स्टॅंडर्डप्रमाणे १०० मीमी ते ५०० मीमी व्यासाचे पुरवठा करणे.

| व्यास | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. निविदेचा दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी निविदेचा दर (रू.) | मे. नोबेल एंटरप्राईजेस निविदेचा दर (रू.) |
|---|---|---|---|
| **१०० मि.मी** | **१२११.७०** | **११७६.००** | **१२१८.००** |
| **१५० मि.मी** | **१९४२.५०** | **१८८५.००** | **१९८२.००** |
| **२०० मि.मी** | **२८४०.२५** | **२७६०.००** | **२८९७.००** |
| **२५० मि.मि** | **३८२७.२५** | **३९५०.००** | **३९०५.००** |
| **३०० मि.मि** | **४९३५.००** | **५०९५.००** | **५०३४.००** |
| **३५० मि.मि** | **६२११.२५** | **७८४४.००** | **६३४२.००** |
| **४०० मि.मि** | **७५७०.५०** | **९५४७.००** | **७७१८.००** |
| **४५० मि.मि** | **९१३५.००** | **११५०८.००** | **९३०६.००** |
| **५०० मि.मि** | **१०७१०.००** | **१३४७४.००** | **१०८९८.००** |

वरील कामासाठी स्पर्धात्मक निविदा दर मागविण्यात आले होते. प्राप्त निविदेनुसार केशरी ॲन्ड कंपनीचे १००,१५०,२०० मि.मी. व्यासाकरीता व अे.ई. इन्फ्राप्रोजेक्टचे २५० ते ५०० मि.मी. व्यासाकरीता दर लघुत्तम आहेत. सदर बाबत केशरी ॲन्ड कंपनीचे १००,१५०,२०० मि.मी. व्यासाकरीता दर कमी करण्यास नकार दिलेला आहे. व अे.ई. इन्फ्राप्रोजेक्टचे २५० ते ५०० मि.मी. व्यासाकरीता दर वाटाघाटीकरीता ४ टक्के कमी करण्यास पत्र देऊन कळविले आहे. त्याप्रमाणे खालीलप्रमाणे दरसुची होत आहे.

| व्यास | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट लि. निविदेचा दर (रू.) | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट लि. वाटाघाटीअंती दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी निविदेचा दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी वाटाघाटीअंती दर (रू.) |
|---|---|---|---|---|
| **१०० मि.मी** | -- | -- | ११७६.०० | **११७६.००** |
| **१५० मि.मी** | -- | -- | १८८५.०० | **१८८५.००** |
| **२०० मि.मी** | -- | -- | २७६०.०० | **२७६०.००** |
| **२५० मि.मि** | ३८२७.२५ | **३६७४.१६** | -- | -- |
| **३०० मि.मि** | ४९३५.०० | **४७३७.६०** | -- | -- |
| **३५० मि.मि** | ६२११.२५ | **५९६२.८०** | -- | -- |
| **४०० मि.मि** | ७५७०.५० | **७२६७.६८** | -- | -- |
| **४५० मि.मि** | ९१३५.०० | **८७६९.६०** | -- | -- |
| **५०० मि.मि** | १०७१०.०० | **१०२८१.६०** | -- | -- |

सदर निविदेचा वाटाघाटीनंतरचे दर वरील प्रमाणे आलेले आहेत. तरी सदर दर हे वाजवी व रास्त असल्याने मान्यता देणेस शिफारस आहे. सबब उपरोक्त लघुत्तम दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजुरीस व याकामी वेळोवेळी येणारी देयके मंजूर करणेस ही सभा मंजूरी देत आहे. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ कोणी नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ८ आहे. विरोधात ७ आहे. तटस्थ कोणी नाही. तर श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९९ :-**

निवीदा मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८८ :-**

दि. ०४/१०/२०११ रोजीच्या दै. फ्रि प्रेस जनरल व दै. पुढारी या वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या विषयांकीत निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदा दिनांक १९/१०/२०११ रोजी उघडण्यात आल्या. त्याबद्दलचा तपशिल खालीलप्रमाणे.

सी. आय. (एस. ॲन्ड एस.) टायटन पाईप्स (LA- Class) आय. एस. नं १५३६:२००१ आणि समकक्ष ISO/B.S स्टॅंडर्डप्रमाणे १०० मीमी ते ५०० मीमी व्यासाचे पुरवठा करणे.

| व्यास | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. निविदेचा दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी निविदेचा दर (रू.) | मे. नोबेल एंटरप्राईजेस निविदेचा दर (रू.) |
|---|---|---|---|
| **१०० मि.मी** | **१२११.७०** | **११७६.००** | **१२१८.००** |
| **१५० मि.मी** | **१९४२.५०** | **१८८५.००** | **१९८२.००** |
| **२०० मि.मी** | **२८४०.२५** | **२७६०.००** | **२८९७.००** |
| **२५० मि.मि** | **३८२७.२५** | **३९५०.००** | **३९०५.००** |
| **३०० मि.मि** | **४९३५.००** | **५०९५.००** | **५०३४.००** |
| **३५० मि.मि** | **६२११.२५** | **७८४४.००** | **६३४२.००** |
| **४०० मि.मि** | **७५७०.५०** | **९५४७.००** | **७७१८.००** |
| **४५० मि.मि** | **९१३५.००** | **११५०८.००** | **९३०६.००** |
| **५०० मि.मि** | **१०७१०.००** | **१३४७४.००** | **१०८९८.००** |

वरील कामासाठी स्पर्धात्मक निविदा दर मागविण्यात आले होते. प्राप्त निविदेनुसार केशरी ॲन्ड कंपनीचे १००,१५०,२०० मि.मी. व्यासाकरीता व अे.ई. इन्फ्राप्रोजेक्टचे २५० ते ५०० मि.मी. व्यासाकरीता दर लघुत्तम आहेत. सदर बाबत केशरी ॲन्ड कंपनीचे १००,१५०,२०० मि.मी. व्यासाकरीता दर कमी करण्यास नकार दिलेला आहे. व अे.ई. इन्फ्राप्रोजेक्टचे २५० ते ५०० मि.मी. व्यासाकरीता दर वाटाघाटीकरीता ४ टक्के कमी करण्यास पत्र देऊन कळविले आहे. त्याप्रमाणे खालीलप्रमाणे दरसुची होत आहे.

| व्यास | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट लि. निविदेचा दर (रू.) | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट लि. वाटाघाटीअंती दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी निविदेचा दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी वाटाघाटीअंती दर (रू.) |
|---|---|---|---|---|
| **१०० मि.मी** | -- | -- | ११७६.०० | **११७६.००** |
| **१५० मि.मी** | -- | -- | १८८५.०० | **१८८५.००** |
| **२०० मि.मी** | -- | -- | २७६०.०० | **२७६०.००** |
| **२५० मि.मि** | ३८२७.२५ | **३६७४.१६** | -- | -- |
| **३०० मि.मि** | ४९३५.०० | **४७३७.६०** | -- | -- |
| **३५० मि.मि** | ६२११.२५ | **५९६२.८०** | -- | -- |
| **४०० मि.मि** | ७५७०.५० | **७२६७.६८** | -- | -- |
| **४५० मि.मि** | ९१३५.०० | **८७६९.६०** | -- | -- |
| **५०० मि.मि** | १०७१०.०० | **१०२८१.६०** | -- | -- |

सदर निविदेचा वाटाघाटीनंतरचे दर वरील प्रमाणे आलेले आहेत. तरी सदर दर हे वाजवी व रास्त असल्याने मान्यता देणेस शिफारस आहे. सबब उपरोक्त लघुत्तम दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजुरीस व याकामी वेळोवेळी येणारी देयके मंजूर करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | १) श्री. शशिकांत भोईर | निरंक |
| २) श्री. ओमप्रकाश गंगागधरजी अग्रवाल | २) श्री. जुबेर इनामदार | |
| ३) श्री. स्टिवन जॉन मेन्डोंसा | ३) श्री. एस. ए. खान | |
| ४) श्री. भगवती शर्मा | ४) श्री. अनिल सावंत | |
| ५) श्रीम. नर्मदा वैती | ५) श्री. लक्ष्मण जंगम | |
| ६) श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | ६) श्रीम. मर्लिन डिसा | |
| ७) श्री. मोहन जाधव | ७) श्रीम. नयना म्हात्रे | |

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| ८) श्री. बर्नड डिमेलो | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १००, मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग),

**मा. सभापती :-**

सदर प्रकरणाचे अवलोकन करण्यात आले.

**प्रकरण क्र. १०० :-**

मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांवा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | कंत्राटदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १. | चवळी पंपिंग स्टेशन ते धावगी डोंगरपर्यंत (लाल बहादूर शास्त्री नगर) येथे जलवाहिनी अंथरणे | **रू.८,७०,९२३/-** | गणेश डेव्हेलोपर्स |
| २. | उत्तन जलकुंभ ते पाली पेट्रोलपंपपर्यंत बिडाची वितरण जलवाहिनी अंथरणे | **रू.९,३०,६००/-** | गणेश डेव्हेलोपर्स |
| ३. | भाईंदर (पुर्व) गोडदेव जलकुंभाच्या आवारात पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.१३,५०,३५३/- | मे. आर. जी. कन्स्ट्रक्शन |
| ४. | मिरा-भाईंदर मनपा क्षेत्रातील साईव्दार बिल्डींग ते तुळशीप्रसाद इमारतपर्यंत जुनी सिमेंटची जलवाहिनी बदलून नवीन बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.५,७०,२९९/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| ५. | मिरा-भाईंदर मनपा क्षेत्रातील न्यु कृष्णा कॉम्प्लेक्स ते ओमकार येथे बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.६,६१,९०५/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| ६. | कनाकिया ते हटकेश परिसरामध्ये जलवाहिनी अंथरणेसाठी खोदलेल्या रस्त्यांची दुरूस्ती करणे | रू.९,६६,६२१/- | शिवपुत्र मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ७. | शांती पार्क व शीतल नगर परिसरामध्ये जलवाहिनी अंथरणेसाठी खोदलेल्या रस्त्यांची दुरूस्ती करणे. | रू.९,८८,५१८/- | श्री गंगा मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ८. | मिरारोड (पुर्व) शांती पार्क येथील विजय पार्क रस्ता ते जांगिड इस्टेटपर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.७,०१,३५९/- | गोपाळकृष्ण मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ९. | मिरारोड (पुर्व) शांती पार्क येथे हॅपी होम कॉम्प्लेक्स समोरील रस्त्यावर बिडाची जलवाहनी पुरविणे व अंथरणे | रू.६,११,७२३/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| १०. | भाईंदर (पुर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका सुचवेल तो इतर जलकुंभ येथून मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे | रू.३८०/- प्रति फेरा | मे. सागर वॉटर सप्लाय |
| ११. | भाईंदर (पुर्व) गोल्डन नेस्ट येथील सोनम सागर पासून सोनम ज्योत पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.९,२३,१३१/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| १२. | मिरारोड (पुर्व) आयप्पा मंदिर ते संस्कृती टॉवर नं. २ येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.७,८४,२७३/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| १३. | मिरारोड (पुर्व) गिता नगर येथील मुख्य रस्त्यावर जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.९,७५,९०१/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| १४. | भाईंदर (पुर्व) हटकेश शांती विद्या नगरी येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.१२,३१,२२८/- | मानस कन्स्ट्रक्शन |

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | डोंगरी येथे नविन पंपिंग स्टेशनचे बांधकाम करणे | रू.१५,०१,४७०/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| १६. | नवघर जलकुंभ येथे संरक्षक भिंत बांधणे | रू.१२,४९,९२३/- | श्री दत्तप्रसाद मजूर कामगार सह. संस्था मर्या. |

वरीलप्रमाणे अ.क्र. १ ते १६ या कामांकरीता मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ "ड" नुसार अवलोकन करून मान्यता देण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०१, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**मा. सभापती :-**

सदर प्रकरणाचे अवलोकन करण्यात आले.

**प्रकरण क्र. १०१ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांस मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजित खर्च | लेखाशिर्ष | मा.आयुक्त निविदा मंजूरी दिनांक | ठेकेदाराचे नांव / कामाचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | रा.म.क्र. ८ मुन्शी कंम्पाउुड येथील शकुन चिकन ते पाण्याची टाकी पर्यत रस्ता उंच करून डांबरीकरण करणे (नगरसेवक निधी) | रू ९,९८,५००/- | नगरसेवक निधी | दि.२४/११/११ | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कं.<br>अंदाजपत्रकिय दराने |
| २ | भाईंदर (पूर्व) नवघर फाटक रोड वरील महेश स्टुडियो ते सुंदर भवन इमारती पर्यत नाला बांधून स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी ) | रू.९,९९,३००/- | नगरसेवक निधी | दि.१४/११/११ | मे. विराज कंन्स्ट्रक्शन<br>अंदाजपत्रकिय दराने |
| ३ | मिरारोड (पूर्व) कुणाल शॉपिंग सेंटर समोर क्रॉस ड्रेन बांधणे. (नगरसेवक निधी ) | रू.११,८९,८६०/- | नगरसेवक निधी / गटारे बांधकाम | दि.०५/११/११ | मे. मुस्कान इंटरप्रायजेस<br>अंदाजपत्रकिय दराने |
| ४ | भाईंदर (प) प्रभाग क्र. २ मधील सागर बेकरी ते राजेश टी स्टॉल पर्यत असलेल्या गटारावर स्लॅब टाकणे. | रू. ९,९८,८००/- | नगरसेवक निधी | दि.०५/११/११ | मे. श्रृती इंटरप्रायजेस<br>अंदाजपत्रकिय दराने |
| ५ | भाईंदर (पूर्व) सोनल पार्क ते सुप्रिया पार्क पर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९९,८५०/- | नगरसेवक निधी | दि.७/१२/११ | मे. राठोड ब्रदर्स<br>0.1 ‰ कमी दराने |
| ६ | भाईंदर (पूर्व) रामदेव पार्क येथील वागड नगर येथील लिबर्टी कॉर्नर ते साई करिष्मा इमारतीपर्यत गटार बांधणे व रस्ता बनविणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९८,४००/- | नगरसेवक निधी | दि.७/१२/११ | मे. विराज कंन्स्ट्रक्शन<br>अंदाजपत्रकिय दराने |
| ७ | मिरारोड (पूर्व) ऐव्हरशाईन नगर रस्त्यावरील धरती कॉम्पलेक्स बि विंग ते सत्यम इमारती पर्यत नविन गटार बांधणे व स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९५,५५०/- | नगरसेवक निधी | दि.७/१२/११ | मे. मुस्कान<br>इंटरप्रायजेस<br>अंदाजपत्रकिय दराने |
| ८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध जंक्शनवरील | रु.१२,०९,९७०/- | सिग्नल यंत्रणा | दि.२१/११/११ | मे. युटीलीटी इंटरप्रायजेस कोटेशन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सिग्नल यंत्रणा व ब्लींकर वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | | | | दराने |

वरील कामे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार अवलोकन करून मान्यता देण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडून एक विषय आलेला आहे. आर्थिक, प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. पाणी पुरवठा विभागाचा आहे. सभागृहाची मान्यता असेल तर हा विषय घेण्यात यावा का? के खाली विषय आलेला आहे तो वाचत आहे. आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने याची माहिती तर द्यावी.

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो, शहरामध्ये जे ३० एम.एल.डी. पाणी एम.आय.डी.सी. कडून येते. तर ते पाणी आपल्या कापरबावडीने येथे पंपींग करायला लागते. तर तो पंपींगचा ठेका आपला डिसेंबरमध्ये संपतो. त्याच्यामुळे हा वार्षिक ठेका आपण फायनल करण्यासाठी प्रशासकीय मंजुरीसाठी पाठवलेला आहे. याच्यामध्ये वर्षाचे दर ठरवणार फक्त त्या ठिकाणी पंप चालवण्यासाठी जे तांत्रिक कामगार लागतात त्यांच पेमेंट आहे आणि ऑपरेशन मेन्टनन्स डे टू डे जे रिपेरिंग असत ते त्या मध्ये असते. मायनर रिपेअरींग असते. मेजर रिपेअरींग नसते.

**जुबेर इनामदार :-**

फक्त ३० एम.एल.डी. का?

**सुरेश वाकोडे :-**

हो ३० एम.एल.डी. साठी वर्षभराचा खर्च हा ४२ लाख ९३ हजार रु. आहे.

**मा. सभापती :-**

कर्मचाऱ्यांचा पगार पण.

**सुरेश वाकोडे :-**

हो. तिथला टेक्निकलांचा पगार.

**जुबेर इनामदार :-**

तिथे आपले कर्मचारी लागणार नाही.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, इथे मोठे पंप वैगेरे आहे. त्या ठिकाणी मोठ ट्रान्सफॉर्मर आहे. यांच्यासाठी त्यांची तज्ञ लोक ठेवायला लागतात.

**जुबेर इनामदार :-**

कर्मचारी हे आपले असणार का?

**सुरेश वाकोडे :-**

आपले नाही. ठेकयाचे कर्मचारी त्यामध्ये असणार. त्यांच्यावर ही सगळी जबाबदारी असणार.

**भगवती शर्मा :-**

उपरोक्त विषयानुसार ठाणे कापूरबावडी येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथील पंपिंग स्टेशनमधून मिरा-भाईंदर महानगरपालिकेस ३० द.ल.लि. प्रति दिन पाणी पुरवठा केला जातो. सदर ठिकाणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस पुरवठा होणाऱ्या पाण्याचा दाब योग्य व सुरळीत राहणेसाठी तीन पंप बसविण्यात आले आहेत. सदर पंपिंग स्टेशन बंद पडल्यास मिरा-भाईंदर महानगरपालिकेस होणारा पाण्याचा दाब कमी होवून पाणी वितरण व्यवस्थेवर त्याचा गंभीर परिणाम होतो. सदर पंप चालविणेसाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची दिवस रात्र पाळीमध्ये आवश्यकता आहे व सदर पंपिंग स्टेशनच्या देखभाल दुरूस्तीचे काम व्यवस्थितरित्या करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ३० द.ल.लि. पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे (कापूरबावडी) येथील पंपिंग स्टेशनच्या वार्षिक देखभाल, दुरूस्ती व चालविणे. | रू.४२,९३,३००/- |

सबब उपरोक्त कामाला मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

अनुसूची २ (के) नुसार सदरचा प्रस्ताव भगवती शर्मा यांनी मांडलेला प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती मॅडम, मला एक विचारायच आहे. उत्तन ते पाली पेट्रोल पंपपर्यंत पाईप लाईन टाकायची ती अर्धवट आहे. रस्ता मंजुर होवून सुध्दा पाईप लाईनच काम बंद ठेवलेल आहे. तर पाईप लाईन पूर्ण होतील तेवढे पाईप नव्हते. तर काम चालू नव्हत करायला पाहिजे होत. किंवा तो रस्ता थांबवला आहे तो रस्ता तरी करुन घ्या.

**सुरेश वाकोडे :-**

सदर रस्त्याची ९०० मि. लाईन टाकलेली आहे. उर्वरित लाईन आहे ती १५ ते २० दिवसात टाकू.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती मॅडम, माझ्या वॉर्डमध्ये एक कच्चा नाला आहे. तर तो थोडासा बनवलेला आहे. जवळ-जवळ काम झालेला आहे. त्या दिवशी मी आयुक्त साहेबांना तिकडे घेवून गेलेली बघण्यासाठी. तर आता त्याच्यामध्ये काय झाल की, भरपूर प्रमाणात कचरा आहे की, हिसाबाच्या बाहेर. शिवाय रोगराई पण चालू झालेली आहे. लोकांना डेंग्यू झालेला आहे. किती तरी लोकांना ताप त्या कच-यामुळे झालेला आहे. त्यात किडे केवढे नी काय केवढे. मॅडम, त्याच्यामध्ये रोज औषध टाकाव लागत. एक दिवसाचा विषय नाही. तो बोर पोकलन लावून कमसे कम तो नाला साफ करुन घ्या. तर मी संदिप शिंदेला फोन केलेला तर संदिप शिंदेनी मला अस उत्तर दिल की, आपल्याला कुठलाही ठेकेदार बोर पोकलन द्यायला तयार नाही म्हणून. तर मी त्यांना प्रश्न विचारला का? तर त्यांनी मला अस सांगितल की, तिकडे मँग्रोजची झाडे आहेत. तर आपल्या ठेकेदारांवर गुन्हे दाखल होतात. म्हणून आपल्याला बोर पोकलन मिळत नाही. तर आपल्याला कलेक्टर साहेबांची परमिशन लागेल. तर मी त्यांना काय सांगितल की, जो पर्यंत मँग्रोजची झाडे नाहीत तेवढा तर नाला साफ करुन घ्या. जेणेकरुन लोकांना रोगराई कमी लागेल. अद्याप पर्यंत त्याच्यावर काही केलेल नाही. इतर नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये फिरत असतील तर ते मला माहित नाही. खरोखर ते कुठे आरोग्याच काम करतात ते त्यांच त्यांनाच माहित. आता माझ्या वॉर्डमध्ये आरोगयाच्या दृष्टीकोनातुन त्या माणसाने एकही फेरी मारली नाही. प्रत्येक वॉर्डातले नगरसेवक प्रत्येक लोक हैराण आहेत. आपले जिकडे-जिकडे दवाखाने, ओ.पी.डी. आहेत तिथे जावून बघा. किती पेशन्ट असतात ते. परंतु आपले पाणपट्टे साहेब कुठल्याही कामाला मदत नाही करत. आयुक्त साहेबांना सांगुन त्यांच्याकडून आरोग्याचा चार्ज काढून टाका. दुस-या अशा अधिका-यांना द्या की, तो खरोखर झटपट झटेल. वॉर्डामध्ये जावून प्रत्यक्ष बघेल. अशा अधिका-यांना चार्ज द्या. मॅडम, आता आपल्याकडे शासनाची लोक आलेली आहेत. प्रत्येक वॉर्डमध्ये, प्रत्येक नगरसेवकांना माहित असेल खरोखर आपल्याकडे शासनाची लोक येवून फिरु लागली. मग, आपले अधिकारी एवढा पगार घेवून करतात काय? आपल्या अधिका-यांना वाटत नाही का की, आपल्या मिरा भाईंदरच्या नागरीकांसाठी काही कराव म्हणून. मिरा भाईंदरचे सगळे नागरीक हैराण आहेत. मच्छर हिसाबाच्या बाहेर झालेले आहेत. माझ्या वॉर्डमध्ये शासनाची चार लोक आलेली. मी त्यांच्या जोडीला फिरली. पाण्याच्या टाक्या मी स्वतः पलटी मारल्या. मला याच्यावर उत्तर पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो. मॅडम जे आता बोलले ना की मी फिर नाही म्हणून. मॅडम माझ्याकडे मुकादम आहे, सफाई कामगार आहे. चिफ सॅनेटरी इन्सपेक्टर आहेत, सार्वजनिक आरोग्य अधिकारी आहेत. ते फिरतात. ज्या ठिकाणी आवश्यकता असेल त्या ठिकाणी मी नक्की फिरतो. आणि शासनाचे जे अधिकारी फिरतात मी स्वतः डिस्ट्रीक्ट ऑफिसरला भेटलेलो आहे. तिथुन माणस मोफत आणलेली आहे. ते स्वतः येवून साफसफाई करतात. कारवाई चालू आहे ना. मी काय मुकादम नाही जे मला फिरायला लागेल.

**नयना म्हात्रे :-**

मुकादम नाही म्हणजे. तुमचा अधिकार आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एस.आय. फिरतात ना. जरुरी नाह डी.एम.सी. प्रत्येक ठिकाणी फिरेल.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही सरळ सांगा ना की मला हा अधिकार देवू नका म्हणून. तुम्ही स्पष्ट बोलाना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तुम्ही तक्रार घेवून माझ्याकडे आलेले का?

**नयना म्हात्रे :-**

माझे नेहमी पत्र आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ज्या-ज्या ठिकाणी आलेले आहे त्या-त्या ठिकाणी एस.आय. ला मी पाठवलेल आहे आणि साफसफाई करुन घेतलेली आहे.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही हे बोलूच नका. मोफत पाठवले म्हणजे काय?

**अनिल सावंत :-**

पाणपट्टे साहेब, लोकप्रतिनिधी बोलतात. तुम्ही त्यांच्याशी हात दाखवून बोलू नका. त्यांच्याशी व्यवस्थित बोला. त्यांच्या वॉर्डमधला प्रॉब्लेम आहे. तुमच्या खालचे अधिकारी काम करत नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

एस.आय. तर वॉर्डमध्ये फिरतोच. पण अधिकाऱ्यांचे काही कर्तव्य नाही का? मग त्या दिवशी माझ्या वॉर्डमध्ये आयुक्तांचे कर्तव्य होत म्हणून ते आयुक्त आले ना. आयुक्तांनी मला असे उत्तर नाही दिले की एस.आय. आहेत म्हणून. आयुक्तांनी मला हे उत्तर द्यायला पाहिजे होते की मी येणार नाही म्हणून. तिकडे मा. आयुक्त प्रत्यक्ष जागेवर बघायला का आले?

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब, तुम्ही हा शब्द वापरला ते बरोबर नाही. मी मुकादम नाही म्हणून. तो तुमचा विभाग आहे. तुम्ही त्या विभागाचे प्रमुख आहे. तुमचे एस.आय. काम करतात नाही करत ते तुम्हाला फिरुन बघायला काय होत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ज्या-ज्या ठिकाणी महत्वाचे असतात. त्या-त्या ठिकाणी.............

**जुबेर इनामदार :-**

आरोग्याची काय परिस्थिती आहे आजच्या तारखेत. तुम्हाला माहित नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

माहित आहे.

**एस.ए.खान :-**

पूर्ण मिरा भाईंदर महत्वाचं आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठेक्याचे काय झाले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वेस्ट ग्लोबल मॅनेजमेन्टसाठी निगोसेशनला बोलवल होत. त्याचे रेट्स ४५ कोटीचे आहे. रेट्स कमी करण्यासंदर्भात काय चर्चा झाली ते रेट्स कमी करायला तयार नाही. आज ते फायनल उत्तर आहे. फायनल झाल्यानंतर ई-टेंडर होईल.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, माणुस एक उत्तर देत नाही. म्हणून महिना पेक्षा जास्त कालावधी उलटून गेलेला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आयुक्त साहेबांची २-३ वेळा या बाबतीत चर्चा झालेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

तो माणुस उत्तर देत नाही. म्हणून आम्ही शहराला ...........

**एस.ए.खान :-**

२ महिने झाले.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती मॅडम, आपल्याकडे ज्यावेळी कचरा भरायला डम्पर जातो. त्यावेळेला कचरा भरुन डम्पर गेला मग त्या ठिकाणी खुप माशा बसतात. तर आपल्या अधिकाऱ्यांना अस सांगा की, पावडर ही आपल्या डंम्पर मध्येच असावी. जेणेकरुन ते कचरा उचलल्या नंतर ते स्वतः पावडर मारतील.

**मर्लिन डिसा :-**

मा. सभापती मॅडम, सोमवारी मिरा भाईंदर ख्रिसमस कार्निवल चालली होती. तेव्हा सिल्व्हर पार्क जवळ, मॅन होलमुळे २९ ईयरची महिला त्याच्यात पडली. मी सगळयांना एस.एम.एस. पाठवले होते. कमिशनर सो., कांबळे साहेबांना सगळयांना पाठवले होते. तर त्याच्या विषयी काय केल. सगळे मॅन्युअली उघडे ठेवले होते. जर तीला पकडले नसते तर ती खाली पडली असती आणि मिळाली पण नसती. तर यासाठी काय काम केलेल आहे. मी खांबित साहेबांना, सगळया डिपार्टमेंटला एस.एम.एस. पाठवले होते. हे धोकादायक आहे ना.

**दिपक खांबित :-**

झाकण लावून घेतो.

**मर्लिन डिसा :-**

झाकण एक्स्ट्रा ठेवायचे. कंम्पलेन्ट आली की, लगेच लावून घ्यायचे.

**प्रकरण क्र. १०२ :-**

के अन्वये प्रस्ताव - आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८९ :-**

उपरोक्त विषयानुसार ठाणे कापूरबावडी येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथील पंपिंग स्टेशनमधून मिरा-भाईंदर महानगरपालिकेस ३० द.ल.लि. प्रति दिन पाणी पुरवठा केला जातो. सदर ठिकाणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस पुरवठा होणाऱ्या पाण्याचा दाब योग्य व सुरळीत राहणेसाठी तीन पंप बसविण्यात आले आहेत. सदर पंपिंग स्टेशन बंद पडल्यास मिरा-भाईंदर महानगरपालिकेस होणारा पाण्याचा दाब कमी होवून पाणी वितरण व्यवस्थेवर त्याचा गंभीर परिणाम होतो. सदर पंप चालविणेसाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची दिवस रात्र पाळीमध्ये आवश्यकता आहे व सदर पंपिंग स्टेशनच्या देखभाल दुरूस्तीचे काम व्यवस्थितरित्या करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ३० द.ल.लि. पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे (कापूरबावडी) येथील पंपिंग स्टेशनच्या वार्षिक देखभाल, दुरूस्ती व चालविणे. | रू.४२,९३,३००/- |

सबब उपरोक्त कामाला मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहीर करते.

**सभा संपल्याची वेळ – दुपारी १२.५५ वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**